201009201503344001

प्रादेशिक योजना - नागपूर
मौजे चक्कीखापा, ता. नागपूर (ग्रामीण) मधील सर्व्हे क्र. ६९, ७२, ७३ व ८७ मधील क्षेत्र कोल माईन्स व कोल बेल्ट मधुन वगळून शेती विभागात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) अन्वये फेरबदलाची सुचना..

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. टिपीएस-२४०७/२५५०/प्र.क्र.३४२/०८/नवि-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १४ सप्टेंबर, २०१०.

शासन निर्णय:- सोबतची सूचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्रदीप गोहिल)
कार्यासन अधिकारी

प्रति,
१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सदर सूचनेचे वर्तमानपत्रातील जाहीरातीचे देयक कृपया आपल्या कार्यालयामार्फत अदा करण्यात यावे.)
३) जिल्हाधिकारी, नागपूर.
४) उप सचिव (नगररचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) उप संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत सूचना शासनाच्या दि. १३ सप्टेंबर, २०१० रोजीच्या परिपत्रकातील निदेशानुसार व खालील सूचनांप्रमाणे जाहीरात म्हणून प्रसिद्ध करुन घेणेबाबत सत्वर कार्यवाही करावी.)

१	जाहीरात देणाऱ्या कार्यालयाचे नांव	-	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२	जाहीरात कोणत्या दिनांकापर्यंत द्यावयाची आहे.	-	तात्काळ
३	प्रसिद्धीचे स्वरुप	-	स्थानिक
४	कोणत्या जिल्ह्यात	-	नागपूर जिल्ह्यात

५	किती वृत्तपत्रात	- एका मराठी व एका इंग्रजी वृत्तपत्रात
६	वृत्तपत्राचे नांव	- सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात
७	कितीवेळा	- एकदा
८	जाहीरात खर्चाचे देयक कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठवावयाचे त्याच्या कार्यालयाचे नांव व संपूर्ण पत्ता	- संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

[illegible]) सहायक संचालक, नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.

(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत सूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)

[illegible]) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.

(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नागपूर विभाग, भाग - एक पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात येवून त्याच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास व संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, उप संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठवाव्यात.)

[illegible]) कक्ष अधिकारी, कार्यासन (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.)

[illegible]) निवडनस्ती-(नवि-९)

****

सूचना
महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - १४ सप्टेंबर, २०१०

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

क्रमांक:-टिपीएस-२४०७/२५५०/प्र.क्र.३४२/०८/नवि-९: ज्याअर्थी, नागपूर प्रादेशिक योजना (यापुढे "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधिले आहे) शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र ३७ वा) (यापुढे उक्त अधिनियम असे संबोधिले आहे) चे कलम १५(१) अन्वये अधिसूचना क्रमांक टिपीएस-२४९८/१५०५/प्र.क्र.२७३/९३/नवि-९, दिनांक ६ मे, २००० अन्वये मंजूर केली असून ती दि. १५ जून, २००० पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी उक्त प्रादेशिक योजनेत मौजे चक्कीखापा, ता. नागपूर (ग्रामीण) मधील सर्व्हे क्र. ६९, ७२, ७३ व ८७ मधील क्षेत्र (यापुढे ज्यास "उक्त क्षेत्र" असे संबोधले आहे) कोल माईन्स व कोल बेल्ट विभागात समाविष्ट आहेत ;

आणि ज्याअर्थी, मुख्यत: कोळसा उत्खनन व केंद्र शासन उपक्रमाची संस्था वेस्टर्न कोल फिल्डस् लि. यांनी जिल्हाधिकारी, नागपूर यांना कळविले आहे की, नागपूर प्रादेशिक योजनेत "कोल माईन्स व कोल बेल्ट" यामध्ये दर्शविलेल्या उक्त जमीनी कोळसा व्याप्त क्षेत्रात नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम-२० पोटकलम-(२) मधील तरतुदीनुसार उक्त क्षेत्र कोल माईन्स व कोल बेल्ट विभागातून वगळून शेती विभागात समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्यास "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे);

आता, त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम - २० पोटकलम (३) अन्वये शासन उक्त फेरबदल करण्याचा इरादा जाहिर करीत आहे व उक्त फेरबदलाच्या अनुषंगाने नागरिकांकडून हरकती व सूचना योग्य त्या कारणांसह, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे लिखीत स्वरुपात मागविण्यात येत आहेत;

हरकती/सूचना उप संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात याव्यात. विहित मुदतीत सुचना/हरकती दाखल करणा-यांना सुनावणी देण्याकरिता व शासनास अहवाल सादर करण्याकरिता शासनातर्फे अधिकारी म्हणुन उप संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

१) जिल्हाधिकारी, नागपूर.
२) उप संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
३) सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.

टिप: सदर फेरबदलाची सुचना विभागाच्या www.urban.maharashtra.Gov.in या वेब साईटवर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशानुसार,

(प्रदीप गोहिल)
कार्यासन अधिकारी

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Urban Development Department
Mantralaya, Mumbai 400 032
Dated: 14th September, 2010.

NOTICE

The Maharashtra Regional & Town Planning Act. 1966
No.TPS-2407/2550/CR-342/08/UD-9: Whereas the Regional Plan of Nagpur Region (hereinafter referred to as the "said Regional Plan") has been sanctioned vide Government Notification of Urban Development Department's under section 15(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. TPS-2496/1506/ CR-273/96/UD-9, dated 6th May, 2000 and came into force with effect from 15th July, 2000 ;

And whereas the lands bearing Survey Nos. 69, 72, 73 & 87 of Mouje Chakkikhapa, Tal. Nagpur (Gramin) (hereinafter referred to as the "said Lands") are shown under zoning "Coal Mines & Coal belt" in the said Regional Plan, Nagpur Region.

And whereas, the main coal exploring & identified Central Govt. undertaking agency "Western coal fields limited" has informed the Collector, Nagpur that the said Lands shown as "Coal mines and Coal Belt" in the Regional Plan of Nagpur are non-coal bearing area. ;

And whereas the Government of Maharashtra is of the opinion that the said Lands should be should be deleted from "Coal mines and Coal Belt" and should be included in Agricultural Zone, as provided in sub-section (2) of section 20 of the said Act (hereinafter referred to as the "said Modification") ;

Now therefore, as provided in sub-section (3) of section 20 of the said Act Government of Maharashtra declares its intention to initiate the said Modification and invites objections and suggestions from the general public within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette. Suggestions / objections shall be addressed to the Deputy Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur who is hereby appointed as the officer to hear the suggestions/objections received within stipulated period only and to submit report on it to Government;

The plans showing the said modification is kept open for inspection by the public during office hours on all working days at the following offices.

1) The Collector, Nagpur.
2) The Deputy Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur.
3) The Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur.

Note:- This Notice is also published on Government web site at www.urban.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(Pradeep Gohil)
Section Officer

G P NAGPUR LONARA 20(3)